जाहीर सूचना

सूचना तमाम जनतेला याद्वारे देण्यात येते की, माझे एक अशील गोरेगाव (पू) स्थित इम्पिरियल हाईटस् म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील ०५व्या मजल्यावरील क्र. ०५ धारक फ्लॅट खरेदी करण्यास इच्छुक आहेत आणि तेव्हा खालील परिशिष्टात अधिक सविस्तरपणे वर्णिलेल्या डब्ल्यूजी सीडीआर रणजीत नारायण बिस्वास, ज्येष्ठ आणि श्रीमती संचाली बिस्वास यांच्या मालकीच्या, ज्यांनी सदर फ्लॅट श्री. राजकुमार बेहल यांच्याकडून ०२.०४.२०१९ दिनांकित नोंदणीकृत विक्री करारादारे खरेदी केला, सदर मिळकतीच्या नामाधिकाराची आम्ही तपासणी करीत आहोत. सदर श्री. राजकुमार बेहल यांनी यांनी सदर मिळकत श्रीमती काजल छगन कुमार पेठानी यांच्याकडून ०७.०६.२०११ दिनांकित नोंदणीकृत विक्री करारादारे खरेदी केला होता, ज्यांनी सदर फ्लॅट मे. विजय असोसिएटस् (वधवा) कन्सट्रक्शन्स प्रा. लि. (''प्रवर्तक'') यांच्याकडून २८.०३.२०१० दिनांकित रजिस्टर्ड आर्टिकल्स ऑफ ॲग्रीमेंट द्वारे खरेदी केला होता. आणि तेव्हा कोणत्याही व्यक्ती/व्यक्तींना सदर मिळकत किंवा त्यावरील कोणत्याही भागाविरोधात किंवा त्यामध्ये वारसा, शेअर, विक्री, गहाण, हस्तांतर, विकास, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, कुळवहिवाट, उप-कुळवहिवाट, धारणाधिकार, परवाना, प्रभार, विश्वस्त, निर्वाह, खटला, निवाडा/हुकूम, आदेश, वाटप, सुविधाधिकार, भेट, मयत, अंत्यदान, अदलाबदल, ताबा भोगवटा, भार, करार, हस्तांतराचा विलेख/विक्री विलेख किंवा अन्य कसेहीच्या मार्गे कोणतेही दावे/आक्षेप असल्यास याद्वारे तसे लिखित स्वरूपात निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय शांतीदूत, तळमजला, सुभाष रोड, मद्रासी राम मंदिर समोर, विले पार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७ येथे तशा दावा/आक्षेपांच्या पूरक दस्तावेज पुराव्यांसह सदर तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, अन्यथा कोणतेही दावे/ आक्षेप नाहीत आणि किंवा ते त्यागित/परित्यागित आहेत असे समजले जाईल.

वरील उल्लेखित मिळकतीचे परिशिष्ट

गाव गोरेगावचा सीटीएस क्र. १ (भाग) धारक प्लॉट क्र. २ए वर बांधण्यात आलेल्या गोरेगाव बस डेपो मागे, बेस्ट कॉलनी जवळ गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०० १०४ स्थित पोडियम १ लेव्हलमधील दोन कार पार्किंग स्पेसेस म्हणजेच कार पार्किंग स्पेस क्र. २७० आणि २७०टी समवेत **''इम्पिरियल हाईटस् को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.,''** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि **''इम्पिरियल हाईटस्''** म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या टॉवर ''ए'' च्या ५ व्या मजल्यावरील मोजमापित १३९० चौ.फू. (कार्पेट एरिया) (''फ्लॅट'') असलेला **फ्लॅट क्र. ५.**

दिनांकित : ११ जानेवारी २०२४

साकळीकर अँड असोसिएट्स करिता

सही/-

ॲड. अमित के. साकळीकर

जाहीर सूचना

तमाम जनतेला ही सूचना देण्यात येते की, श्रीमती लोपमुद्रा मौलिक आणि श्री. सुभेंदू मौलिक हे मिळकतीच्या परिशिष्टात अधिक सविस्तरपणे वर्णिलेली मिळकत पत सुविधा मिळण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, मादाम कामा रोड, मुंबई यांच्याकडे गहाण ठेवू इच्छित आहेत.

ज्याअर्थी, श्रीमती इंदिरा अरविंद मेहता आणि श्री. मितेश अरविंद मेहता (हस्तांतरक) आणि श्रीमती लोपमुद्रा मौलिक आणि श्री. सुभेंदू मौलिक (हस्तांतरिकी) यांच्यात झालेला अ. क्र. बीडीआर -१५/०३१२४/२००७ द्वारे नोंदणीकृत २५/०४/२००७ दिनांकित मूळ विक्री करार हरवला/गहाळ झाला आहे आणि सध्याचे मालक उपरोक्त मूळ नामाधिकार दस्तावेज उपलब्ध नसताना परिशिष्टित मिळकत स्टेट बँक ऑफ इंडिया, मादाम कामा रोड, मुंबई यांच्याकडे गहाण ठेवू इच्छित आहेत.

कोणत्याही व्यक्तीला वरील सदर करारांद्वारे कोणताही दावा असल्यास आणि/किंवा सदर मिळकतीच्या संदर्भामध्ये कोणताही हक्क, नामाधिकार, हितसंबंध किंवा दावा किंवा कोणत्याही प्रकारे सदर मिळकतीचा कब्जा जसे की, कोणताही करार, उपक्रम, विक्री करीता करार, हस्तांतर, अदलाबदल, अभिहस्तांतरण, अभिहस्तांकन, प्रभार, गहाण, भेट, विश्वस्त, वारसाहक्क, भाडेपट्टा, धारणाधिकार, मासिक भाडेपट्टा, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भागीदारी, संयुक्त उपक्रम, सुविधाधिकार, कोणताही प्रतिकुल हक्क किंवा दावा, वाद, खटला, हुकुम, आदेश, प्रतिबंधात्मक करार, निषेधाज्ञा, जप्ती, संपादन किंवा अन्यकाही दावे असल्यास ते निम्नस्वाक्षरीकारांना लिखित स्वरूपात या प्रसिद्धीच्या तारखेपासून **१४ दिवसांच्या** आत निम्नस्वाक्षरीकारांना पूरक लिखित पोचपावती समक्ष हातपोच किंवा नोंदणीकृत पोस्ट एडी सह कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, कोणतेही तसे दावे त्यागित आणि/किंवा परित्यागित समजले जातील.

मिळकतीचे परिशिष्ट

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील आणि मुंबई शहर आणि उपनगरचा नोंदणी जिल्हा आणि उपजिल्ह्यातील तालुका अंधेरी गाव मोगराचा सिटी सर्व्हे क्र. ३७३, ३७३/१ ते ३७३/१३, सर्व्हे क्र. २६, हिस्सा क्र. २, सर्व्हे क्र. २७, हिस्सा क्र. ६ आणि ७, सर्व्हे क्र. २८, हिस्सा क्र. १, सर्व्हे २९, हिस्सा क्र. ३ (भाग), सर्व्हे क्र. ४३ हिस्सा क्र. १ धारक एनए जमिनीवर स्थित राजमाता जिजाबाई भार्ग, पंप हाऊस, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३ येथील ''निर्माझ रेसिडेन्सी को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेड''च्या **''निर्माण रेसिडेन्सी''** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीच्या बिल्डिंग क्र. ८ मधील ''ए'' विंगमधील ७व्या मजल्यावरील मोजमापित ७२२ चौ.फू. **फ्लॅट क्र. ७०३.**

ॲड. परिणीत सराटकर

भागीदार

मे. एसएसपी लिगल,

ॲडव्होकेटस् ॲण्ड कन्सलटंटस्

१७-बी, ३रा मजला, कृष्ण निवास,

२८१ एसबीएस रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

ठिकाण: मुंबई **दिनांक:** ११/०१/२०२४

जाहिर नोटिस

माझे अशिल श्री यश केतन मेहता, हे सध्याचे सभासद व कै. जिग्ना केतन मेहता यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत ज्या प्रथमेश जनाडु सी विंग सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, वीरा देसाई रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५३ च्या सभासद होत्या आणि तसेच त्या वरील सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक २०२ च्या मालक होत्या ज्याचे क्षेत्रफळ सुमारे ५१.५८ चौ.मिटर बिल्ट अप आहे. (अशा त्या फ्लॅटला हयापुढे तो फ्लॅट म्हणावा) आणि त्या सोसायटीचे पन्नास भागचे धारक होत्या. प्रत्येक भागाची किंमत रु.५०/- आहे. शेअर सर्टीफिकेट कं.६ आणि शेअर्स नं.२५१ ते ३०० आहे. माझ्या अशिलांनी वरील फ्लॅट संभाव्य खरेदीदारांच्या नावावर विकण्याचा हेतु आहे आणि त्यामुळे मी हया नोटीसीद्वारे सर्वांना हे जाहीर करते कि ज्यांचा हा फ्लॅट विकण्यास विरोध हरकत आहे त्यांनी ही जाहीर नोटीस प्रस्तुत झालेल्या दिवसापासून १५ दिवसाच्या आत आपली हरकत नोंदवावी, अन्यथा माझे अशिल वरील फ्लॅट संभाव्य खरेदीदारांच्या नावावर विकतील.

आणि म्हणून ज्या कोण्या व्यक्तिचा/व्यक्तिंचा वरील फ्लॅटवर अधिकार, मालकी, हक्क, शेअर संबंध असेल किंवा हया फ्लॅटवर ऋण असेल किंवा हा फ्लॅट कुणाकडेही गहाण असेल, वारसाने दिला असेल, कुणाचे हया फ्लॅटवर हक्क असतील भाडे असेल, न्यायालयाच्या हया फ्लॅटसंबंधी हुकूम असेल किंवा हा फ्लॅट कुणाला वक्षीस दिला असेल, कुठल्या कारणाने हया फ्लॅटवर कुणाचा हक्क असेल तर त्याने ही हया फ्लॅटसंबंधी जाहीर नोटीस प्रस्तुत झालेल्या दिवसापासून १५ दिवसाच्या आंत आपली लेखी हरकत हया फ्लॅटच्या दस्तऐवज कागदीपत्रासह आपली हरकत खालील सही करणाऱ्याकडे द्यावी. आणि सदरील १५ दिवसामध्ये कोणाची ही हरकत आली नसल्यास माझे वरील अशिल हे गृहीत धरतील कि हया फ्लॅटवर कुणाचाही कसल्याही प्रकारे बोजा नाही व सदर फ्लॅटची पुढील कार्यवाही करण्यास मुक्त राहतील.

दिनांक : ११ जानेवारी, २०२४

सही :

रूपाली देवगुडे - शिंदे

वकील

रूम नं.५, पहिला माळा, सरस्वती को - ऑ. हौसिंग सोसायटी लि., नेताजी सुभाष रोड, जोशी वाडी, मुलुंड (पश्चिम) मुंबई - ४०० ०८०.

उपनिबंधक सहकारी संस्था, नाशिक तालुका नाशिक यांचे कार्यालय

पत्ता : सहकार संकुल, नॅशनल उर्दु हायस्कुल, वाणी हाऊस जवळ, सारडा सर्कल, नाशिक ता. जि. नाशिक

जावक क्र. १३९/पेपर नोटीस दि. ०९/०१/२०२४

सुनावणी नोटीस

शिवकृपा सहकारी पतपेढी लि.मुंबई या संस्थेच्या खालील कर्जदारांच्या नावापुढे नमुद असलेली रक्कम थकित झालेली आहे. मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक जिल्हा नाशिक यांचेकडील कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी दावा दाखल करण्यात आलेला आहे. सदर दाव्याच्या अनुषंगाने त्यांचे कार्यालयाकडे दि.२१/११/२०२३ व दि. ०६/१२/२०२३ रोजी सुनावणी नोटीस त्यांनी संस्थेकडे दिलेल्या नोंदणीकृत पत्त्यावर पोष्टाद्वारे आर.पी.डी. ने पाठविण्यात आलेल्या होत्या. खालील कर्जदार व जामीनदार सुनावणीस उपस्थित राहिले नाही. त्यांच्या पत्यावर सुनावणी नोटीस पाठविली असता पत्त्यावर तपास लागला नाही. पा.स. परत या कार्यालयात आलेल्या आहेत. सबब संबंधीत कर्जदार/जामीनदार यांना या सुनावणी नोटीसद्वारे अंतिम जाहीर नोटीस देण्यात येते की, दि. १६/०१/२०२४ रोजी सकाळी ११.३० वा. सदर संस्थेने या कार्यालयात आपले विरूध्द दाखल केलेल्या दाव्यासंदर्भात लेखी म्हणणे मांडणेकामी व सुनावणीसाठी उपस्थित रहावे. सदर सुनावणीस उपस्थित न राहिल्यास कर्जदार/जामीनदार यांचे विरुध्द पुढील कायदेशीर कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी.

अ.क्र.	कर्जदार/जामीनदार नाव		रक्कम
१	श्रीमती. सुनंदा भिकाजी गामणे	(कर्जदार)	३,२५,२५१/-
	श्री. नवनाथ चंद्रकांत गामणे	(सहकर्जदार)	
	श्री. विनोद भानुदास निकम	(जामीनदार)	
	सौ. वर्षा शेखर हेडाऊ	(जामीनदार)	
	श्री. राहुल अशोक अस्वले	(जामीनदार)	
	श्री. मनोज गणपत भागवत	(जामीनदार)	

सदरचे जाहीर निवेदन माझ्या सही शिक्क्यानिशी दि.०९/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

ठिकाण : नाशिक

दिनांक : ०९/०१/२०२४

(शिक्का)

सही/- श्री. संदीप जाधव,

मा.उपनिबंधक

सहकारी संस्था, नाशिक, ता.जि. नाशिक

यूनियन बैंक ऑफ इंडिया (Union Bank of India)

युनियन बँक ऑफ इंडिया
तळ मजला, घनश्याम चेंबर, सिटी मॉल समोर,
न्यू लिंक रोड, ओशिवरा, मुंबई-४०००५३
ई-मेल: ubin0933341@unionbankofindia.bank,
मो.क्र. : ९३२४९८८२५५

कब्जा सूचना

नियम-८(१)

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकर्ता, युनियन बँक ऑफ इंडिया, गोपी घनश्याम चेंबर, तळ मजला, सिटी मॉल समोर, न्यू लिंक रोड, ओशिवरा, अंधेरी पश्चिम, मुंबई-४०००५३ चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) अन्वये आणि कलम १३ (१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या नियम ९ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **२०.१०.२०२३** रोजी एक मागणी सूचना जारी करून कर्जदार **सौ. नीता शिवाजी जाधव मयत शिवाजी रामचंद्र जाधव यांची पत्नी** यांना सदर सूचनेत नमूद रक्कम रोजीस **रु. १५,६७,७४५.००/- (रुपये पंधरा लाख सदुसष्ट हजार सातशे पंचेचाळीस मात्र) ३०.०९.२०२३ रोजीस** या रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.

सदर रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा कब्जा त्यांना सदर ॲक्टच्या कलम १३ (४) च्या नियम ९ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून ह्या ०४-०१-२०२४ घेतला.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, उक्त मिळकतीशी व्यवहार करू नये व सदर मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार हा युनियन बँक ऑफ इंडिया, गोपी घनश्याम चेंबर, तळ मजला, सिटी मॉल समोर, न्यू लिंक रोड, ओशिवरा, अंधेरी पश्चिम, मुंबई-४०००५३ च्या रक्कम रु. १५,६७,७४५.००/- (रुपये पंधरा लाख सदुसष्ट हजार सातशे पंचेचाळीस मात्र)३०.०९.२०२३ रोजी बँकेला अंतिम देयक देईपर्यंत अनुषंगिक खर्च, प्रभार, शुल्क इत्यादींसह कंत्राटी दराने मिळविलेले/व वसूल केलेले व्याज.

तारण मत्तांच्या भरणाकरीता उपलब्ध वेळेच्या संदर्भामध्ये ॲक्टच्या कलम १३ चे उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेतले जात आहे.

तारणाचे वर्णन:

निवासी फ्लॅट परिसर धारक क्र. ४०४, ४था मजला, बी विंग, चौधरी एलिट, प्रिन्स मेडिकल ग्रामपंचायत हाऊस क्र. १४२०, १४३०, १३९४ आणि १३८२, पोस्ट खारघर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड-४१०२१० असलेले स्थावर मिळकती चे ते सर्व., मयत शिवाजी रामचंद्र जाधव यांच्या नावाने. बिल्ट अप क्षेत्र ३१९ चौ.फू., चटई क्षेत्र २६६.०५ चौ.फू.

आपले विश्वासू

दिनांक: ०९-०१-२०२४ **सही/- प्राधिकृत अधिकारी**

ठिकाण: मुंबई **युनियन बँक ऑफ इंडिया करीता**

जाहीर सूचना

एक चंद्रिका आर. शाह, हिरेन आर. शाह, जिग्ना एस. शाह आणि सुजीत आर. शाह यांचा दिवंगत रमेश एच. शाह यांचे एकमेव वारसदार आणि फ्लॅट क्र. ३०२, तिसरा मजला, ए विंग, श्रध्दा सुमन मंडपेश्वर रोड, गोकुळ हॉटेलजवळ, बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२, गाव एक्सारचा सर्व्हे क्र. २४३५, ३४३१/१ ते १५ धारक (यापुढे ''सदर मिळकत'' असा उल्लेख) चे मालक असल्याचा दावा आहे. सदर मिळकतीतील दिवंगत रमेश एच. शाह यांच्या शेअराबाबत सदर संयुक्त मालकांनी परपरांमध्ये हक्कसोड पत्र तयार आणि नोंदणीकृत केले आहे.

कोणत्याही व्यक्तीला/ व्यक्तींना वरील सदर मिळकत किंवा त्यावरील कोणत्याही भागामध्ये हितसंबंध जसे की, विक्री, भेट, भाडेपट्टा, वारसाहक्क, अदलाबदल, गहाण, प्रभार, धारणाधिकार, विश्वस्त, ताबा, सुविधाधिकार, जप्ती किंवा अन्यकाही दावे किंवा हितसंबंध असल्यास सदर ज्ञात लिखित निम्नस्वाक्षरीकारांना खालील नमूद कार्यालयाच्या पत्त्यावर दाव्यांशी संबंधित सर्व पुरक दस्तावेजांसह या तारखेपासून ७ दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, कोणत्याही तशा दाव्याच्या संदर्भाशिवाय माझे अशील येस बँक लि. यांच्या नावे गहाण तयार केले जाईल आणि दावे जर असल्यास, ते त्यागित समजले जातील.

सही/-

वकील किरण शर्मा/लिगल सारथी,

४१८, श्रीकांत चेंबर्स, ए विंग,

व्ही.एन. पुरव मार्ग, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.

ई-मेल : kiran@legalsaarthi.com

दिनांकित ११ जानेवारी, २०२४

सानंद, अहमदाबाद येथील स्टील प्लांट येथे व्यवसाय चालवणे आणि कामकाज करण्यासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती/प्रस्ताव मागवणारी सूचना

खालील तपशील असलेला स्टील प्लांट चालवणारे आणि त्यांचे मालक नामी स्टील प्रायव्हेट लिमिटेड (सीआयएन: यु२७१००जीजे२०१२पीटीसी०७१२७०) च्या प्रकरणात हे आहे:

अ. क्र.	वर्णन	मेल्टिंग इंडक्शन	एओडी* सह मेल्टिंग क्युम्युलेटिव्ह	शेलिंग	ब्राईट बार
		दर महा मेट्रीक टन			
१	स्थापित	२४००	३१००	४५००	२००

* एओडी मेल्टिंग (इंडक्शन सह क्युम्युलेटिव्ह) फक्त इंडक्शन मेल्टिंग सोबत टँडेम मध्ये साध्य होऊ शकते नामी स्टील प्रायव्हेट लिमिटेड **(''कॉर्पोरेट कर्जदार'')** हे आदेश क्र. सीपी (आयबी)२३६/एनसीएलटी/एएचएम/२०२१ धारक १६ ऑगस्ट, २०२२ दिनांकित नामदार राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, अहमदाबादच्या आदेशाद्वारे संस्थात्मक नादारी निराकरण प्रक्रियेत आहे. धनकॅच्या समितीने कॉर्पोरेट कर्जदारांचे समापन करण्याचे ठरवले आहे, सदर अर्जावरील निर्णय प्रलंबित आहे.

ह्या पार्श्वभूमीवर, धनकॉच्या समितीच्या निर्देशांनी निराकरण व्यावसायीक याद्वारे सर्व्हे क्र. ३१६-पी, ३१७-पी, ३४२-पी व ३४३-पी, नॅनो फोर्ड रोड, छारोडी रेल्वे स्टेशन समोर, सानंद, अहमदाबाद, गुजरात-३८२११० येथे स्थित कॉर्पोरेट कर्जदारांचा स्टील मॅन्युफॅक्चरींग प्लांट चालवण्यासाठी आणि व्यवसाय करण्यासाठी इच्छुक पक्षकारांकडून स्वारस्याची अभिव्यक्ती निमंत्रित करत आहेत.

स्वारस्याची अभिव्यक्ती पासवर्ड संरक्षित फाईल मध्ये फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने स्वीकारली जाईल. विनिर्देश, पात्रता निकष, इसारा अनामत रकम, अटी व शर्ती इ. सह सर्व संबंधित तपशील प्रोसेस डॉक्युमेंट मध्ये उपलब्ध आहेत जे कॉर्पोरेट कर्जदारांची वेबसाईट https://namisteel.com वर टाकले आहेत जे इच्छुक पक्षकारांना विनामूल्य डाऊनलोड करता येतील. ईओआय cirpnamisteel@gmail.com वर ईमेल ने सादर केली पाहीजे आणि मूळ हार्ड कॉपी प्रोसेस डॉक्युमेंट प्रमाणे पत्रव्यवहारासाठी येथे खाली दिलेल्या पत्त्यावर पाठवावी.

मूळ दस्तावेज उशीरा/विलंबाने/न सादर करणे यामुळे ईओआय फेटाळली जाऊ शकते. ईओआय ला इच्छुक पक्षकारांनी उशिरात उशीरा १५ जानेवारी, २०२४ पर्यंत सादर केले पाहीजे.

टीपा:

१. आयबीबीआय कडे नोंदणीकृत पत्ता सध्या बदलण्याच्या विचाराधीन आहे. दरम्यान सर्व दळणवळण आणि प्रोसेस दस्तावेजांशी संबंधित बोली सादर करण्याकरिता खाली दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्याचा कृपया वापर करावा.

२. वेळापत्रक आरपी/सीओसी कडून होणाऱ्या कोणत्याही सुधारणांच्या अधीन आहे.

३. कमिटी ऑफ क्रेडिटर्स (''सीओसी'') च्या निर्देशांवरुन निराकरण व्यावसायीक (''आरपी'') यांनाकोणत्याही वेळी ईओआय साठी निकष बदलण्याचे स्वेच्छा निर्णय असतील.

४. आरपी/सीओसी कोणतेही कारण न देता आणि कोणत्याही दायित्वाशिवाय प्रक्रिया/अर्ज रद्द किंवा सुधारित करण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत.

सही/-

दिनांक: १० जानेवारी, २०२४ **श्री. उदयराज पटवर्धन**

ठिकाण: सानंद, अहमदाबाद **आयपी नोंदणी क्र.:** आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०००२४/२०१६-१७/१००५७

नामी स्टील प्रा. लि. चे निराकरण व्यवसायीक

(टीप १) निराकरण व्यावसायीकांचा नोंदणीकृत पत्ता:

नमन मिडटाऊन, बी विंग, ११०६, ११वा मजला, कामगार कला केंद्र मागे, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन पश्चिम, मुंबई शहर, महाराष्ट्र-४०० ०१३.

असाईनमेंट नं. साठी प्राधिकृती: एए१/१००५७/०२/१८१२२४/१०६६११ १८ डिसेंबर, २०२४ पर्यंत वैध)

(टीप १) पत्रव्यवहारासाठी पत्ता : कोहिनूर स्क्वेअर, वेस्ट टॉवर, बी विंग, झेऊस, ४४०७, ४४वा मजला, एन.सी. केळकर रोड, शिवाजी पार्क, दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८.

पत्रव्यवहारासाठी प्रक्रिया विनिर्दीष्टीत ई-मेल आयडी: cirpnamisteel@gmail.com

बँक ऑफ महाराष्ट्र (Bank of Maharashtra)

बँक ऑफ महाराष्ट्र
वर्सोवा शाखा, मुंबई (०४१६)
माझडॉक ए. इमारत जे.पी. रोड ७ बंगलोज्
वर्सोवा मुंबई मुंबई ४०००६१
ईमेल : bom416@mahabank.co.in
मुख्य कार्यालय.: लोकमंगल, १५०१, शिवाजीनगर, पुणे-५

(स्थावर मिळकतीकरिता) कब्जा सूचना (नियम ८(१)पहा)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी **बँक ऑफ महाराष्ट्र, मुंबई नॉर्थ झोन, मुंबई ४०००५१ चे** प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ सहवाचता कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **०३/१०/२०२३ रोजी मागणी सूचना आणि पुढे ११/१०/२०२३ रोजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध** जारी करून **कर्जदार - श्री. राहुल गणेश चव्हाण गणेश चव्हाण यांच्या मुलगा** यांना सूचनेत नमूद संपूर्ण रक्कम **हाऊसिंग टर्म कर्ज खाते क्रमांक ६०४१३७११८३८** आणि **दुसरा हाऊसिंग टार्म कर्ज खाते क्र. ६०४१६७१२७७४** करिता **रु. ७७,२३,८६२.२८/- (रुपये सत्याहत्तर लाख तेवीस हजार आठशे बासष्ट आणि अठ्ठावीस पैसे मात्र)** त्यासह पुढील व्याज आणि खर्च ही रक्कम सदर सूचना प्राप्तीच्या तारखेपासून **६० दिवसांत** चुकती करण्यासाठी बोलाविण्याकरिता आले होते.

कर्जदार यांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, निम्नस्वाक्षरीकारांनी सदर ॲक्टच्या कलम १३ चे उप कलम ४ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये त्याला/तिला प्राप्त अधिकारांचा वापर करून येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा **६ जानेवारी २०२४** रोजी **सांकेतिक कब्जा** घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मिळकतीसह देवघेवीचा व्यवहार करू नये आणि मिळकतीसह केलेला देवघेवीचा कोणताही व्यवहार हा बँक ऑफ महाराष्ट्रच्या रक्कम रु. **७७,२३,८६२.२८/- (रुपये सत्याहत्तर लाख तेवीस हजार आठशे बासष्ट आणि अठ्ठावीस पैसे मात्र)** त्यासह पुढील व्याज आणि इतर खर्च.

तारण मत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात ॲक्टचे कलम १३ चे उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेतले जाते.

बँकेकडे गहाण असलेल्या आणि बँकेने ताबा घेतलेल्या मिळकतींचा तपशील खालीलप्रमाणे:-

अ. क्र.	तपशील	तपशील
१.	**स्थावर मिळकतीचे तपशील :- सुविधा -१ कर्ज खाते क्र. ६०४१३७११८३८**	**मिळकतीचे मालक - श्री. राहुल गणेश चव्हाण गणेश दत्तात्रय चव्हाण यांच्या मुलगा.** गाव कटाई, तालुका कल्याण, जिल्हा-ठाणे, सर्व्हे क्र. ७७ आणि हिस्सा क्र. ४ स्थित सीता हाइट्स अशा ज्ञात बिल्डिंग मधील ए विंग, २रा मजला खाली बांधकमित फ्लॅट क्र. २०४ येथे स्थित मिळकती चे समतुल्य गहाण. **फ्लॅटचा प्रकार-** १बीएचके, **क्षेत्र-** ३८.४१ चौ.मी. चटई गाव कटाई, ता.कल्याण, जिल्हा ठाणे धारक सर्व्हे क्र. ७७, हिस्सा क्र. ४ मध्ये स्थित मिळकती चे ते सर्व भाग आणि विभाग.
२.	**स्थावर मिळकतीचे तपशील :- सुविधा -२ कर्ज खाते क्र. ६०४१३७१२७७४**	**मिळकतीचे मालक - श्री. राहुल गणेश चव्हाण गणेश दत्तात्रय चव्हाण यांच्या मुलगा.** गाव कटाई, तालुका कल्याण, जिल्हा-ठाणे, सर्व्हे क्र. ७७ आणि हिस्सा क्र. ४ स्थित सीता हाइट्स अशा ज्ञात बिल्डिंग मधील ए विंग, २रा मजला खाली बांधकमित फ्लॅट क्र. २०४ येथे स्थित मिळकती चे समतुल्य गहाण. **फ्लॅटचा प्रकार-** १बीएचके, **क्षेत्र-** ३८.४१ चौ.मी. चटई गाव कटाई, ता.कल्याण, जिल्हा ठाणे धारक सर्व्हे क्र. ७७, हिस्सा क्र. ४ मध्ये स्थित मिळकती चे ते सर्व भाग आणि विभाग.

दिनांक : ०६.०१.२०२४ **सही/-**

ठिकाण: मुंबई **प्राधिकृत अधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र**

न्यायालय खोली क्र. ३

मुंबई येथील नगर दिवाणी न्यायालयात दिंडोशी येथील बोरिवली विभाग

वाणिज्यिक वाद क्र. २४० सन २०२२

आयसीआयसीआय बँक लि.

कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये स्थापित आणि नोंदणीकृत आणि आणि स्थापित आणि बँकिंग रेग्यलेशन ॲक्ट, १९४९ अन्वये परवानाधारक निगम मंडळ, जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे आयसीआयसीआय बँक टॉवर, चकली सर्कल जवळ, जुना पादरा रोड, बडोदा ३९०००७, गुजरात येथे आणि तिचे कॉर्पोरेट कार्यालय आहे आयसीआयसीआय बँक टॉवर्स, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई-४०००५१ येथे द्वारा तिचे प्राधिकृत अधिकारी **सौ. शिल्पा वसंत निकम,** वय ३६ वर्ष.

... वादी

विरुध्द

मनोजकुमार पाठक,

भारतीय रहिवासी, प्रौढ, वय माहित नाही आणि पेशा नोकरी, ज्यांचा पत्ता आहे, १०३, सीएचएस लिमिटेड, आचोळे तलाव, जैन मंदिर जवळ, आचोळे रोड, नालासोपारा पूर्व, ठाणे-४०१२०९. **... प्रतिवादी**

सूचना घ्यावी की, सदर सन्माननीय न्यायालय खालील अनुतोषांकरिता वरील नावाच्या प्रतिवादींद्वारे **१७ जानेवारी, २०२४** रोजी स. ११ वा. मध्यान्ह वेळी न्यायालय खोली क्र. ३ मधील पीठासिन सन्माननीय न्यायाधिश **श्रीम. एस. एस. तोडकर** यांच्यासमोर प्रचलित होणार आहे.

ए) प्रतिवादींना वसुली आणि/किंवा प्रदानापर्यंत वाद दाखल झाल्याच्या तारखेपासून मासिक आधारे **द.सा. १३.९९%** दराने **रु. ४,७५,१५४/-** च्या मुद्दल रकमेवरील पुढील व्याजासह कर्ज खात्याच्या अंतर्गत येथील निशाणी 'जी' अशा दाव्याच्या तपशिलानुसार दिनांक **६ ऑगस्ट, २०१८ आणि १४ ऑगस्ट, २०१८** (येथील निशाणी 'डी' आणि 'ई') रोजीची अधिक महत्त्वाची माहिती आणि पत सुविधा अर्ज प्रपत्राच्या अंतर्गत **रु. ५,२८,४८२/- (रुपये पाच लाख अठ्ठावीस हजार चारशे ब्याऐंशी मात्र)** ची रक्कम वादींना चुकती करण्याचे आदेश आणि निर्देश द्यावेत.

बी) वादाच्या खर्चाकरिता

सदर दिनांक २६ डिसेंबर, २०२३

प्रबंधकांकरिता

नगर दिवाणी न्यायालय,

दिंडोशी येथील

सीलर,

सदर रिट समन्स यांनी काढले

मे. एच. एम. लिगल असोसिएटस्

वादींकरिता वकील

कार्यालय क्र. ७५, ७ वा मजला,

'बी' विंग, मित्तल टॉवर्स,

नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१.

ईमेल आयडी: hmlegal@gmail.com

फोन: ०२२०२४५९६

प्रत्यक्ष कब्जा सूचना

ICICI Bank

शाखा कार्यालय: आयसीआयसीआय बँक लि., कार्यालय क्रमांक २०१-बी, २रा मजला, रोड क्र. १, प्लॉट क्र - बी३, वायफाय आयटी पार्क, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे, महाराष्ट्र-४००६०४.

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार हे आयसीआयसीआय बँक लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्यु